# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१८८

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/हि.प.२०/२०२१/ 021 दि. 04 FEB 2021

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- हिवाळी परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत.**

संदर्भ :- १. मंडळाचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे वेळापत्रक क्र. MSBTE/D-40/Aademiccalender/B2/2020 / 0107 दि.०८.१२.२०२०.

२. मंडळाच्या विद्वत समितीची बैठक दि. ०३.०२.२०२१.

महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत पदविका अभ्यासक्रमाच्या हिवाळी २०२० परीक्षेचे आयोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत सर्व संस्थांना, विद्यार्थ्यांना उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या पत्राद्वारे कळविण्यात आले होते. हिवाळी परीक्षा २०२०ची रुपरेषा व कार्यपध्दती ठरविण्याकरिता मंडळाच्या विद्वत समितीची बैठक दि. ०३.०२.२०२१ रोजी आयोजीत करण्यात आली होती. विद्वत समितीच्या शिफारशी व मान्यतेने हिवाळी २०२० परीक्षेबाबतच्या ठळक बाबी मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था, विद्यार्थ्यांना व पालकांना माहिती व कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन तोंडी पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. याकरिता विविध मिटींग ॲप्लिकेशनचा वापर करुन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. शक्य नसल्यास टेलीफोनिक पध्दतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा संस्थास्तरावर घेण्यात यावी. वरील सर्व प्रयत्नांनंतरही विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे सत्रकर्म, जर्नल्स, निरंतर मुल्यमापन या अधारावर मुल्यमापन करुन गुण देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) अभ्यासक्रमातील सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरुन ऑनलाईन पध्दतीने मंडळस्तरावरुन घेण्यात येईल. सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/Laptop/Tablet/Desktop इत्यादीचा वापर करुन सद्यपरिस्थीत ज्याठिकाणी वास्तव्यास आहेत त्याठिकाणाहुन देवु शकतील. सदर परीक्षेत विद्यार्थ्यांना ४० पैकी ३० प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्न ०१ गुणाचा असेल व सदर परीक्षेचा कालावधी ०१ तासाचा असेल. सदर ४० प्रश्न संपुर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असतील. ऑनलाईन परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक व परीक्षेच्या कार्यप्रणालीबाबतच्या मागदर्शक सुचना विद्यार्थ्यांना व संस्थांना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

३. खालील तक्त्यात नमुद विषयांच्या अभ्यासक्रमात Drawing चा समावेश असल्याने या विषयांची परिक्षा MCQ वापरुन घेणे शक्य नाही. सदर विषयांची परीक्षा सत्रकर्म/अभ्यासक्रमावर आधारीत सादरीकरणाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. सदर सादरीकरण तसेच तोंडी प्रश्नोत्तरांच्या आधारे परिक्षक मुल्यांकन करतील.

| Sr. No. | Paper Code | Subject Code |
|---|---|---|
| 1 | 905 | Engineering Drawing |
| 2 | 12634 | Architectural Design –II |
| 3 | 17309 | Building Drawing |
| 4 | 17647 | Chemical Engineering Drawing |
| 5 | 17923 | Engineering Drawing |
| 6 | 17940 | Mechanical Engineering Drawing |
| 7 | 19601 | Architectural Design |
| 8 | 22207 | Engineering Drawing |
| 9 | 22341 | Mechanical Working Drawing |
| 10 | 22405 | Building Planning And Drawing |

उपरोक्त नमुद केलेल्या Drawing विषयांची परीक्षा संस्थास्तरावर दि. २३ ते २५ फेब्रुवारी २०२१ दरम्यान घेण्यात यावी.

४. शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) सर्व सत्र/वर्षातील नियमित विद्यार्थी व बॅकलॉग विद्यार्थी यांची लेखी परीक्षा संस्था स्तरावर ऑनलाईन पध्दतीने Multiple Choice Question (MCQ) चा वापर करुन घेण्यात यावी. संस्थेने याबाबत वेळापत्रक तयार करुन विद्यार्थ्यांना त्याची माहिती द्यावी व मार्गदर्शन करावे. सदर संस्था स्तरावरील परीक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना संस्थांना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

५. ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता इंटरनेट, संगणक, मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता शेवटचा पर्याय म्हणुन ऑनलाईन परीक्षा नजिकच्या तंत्रनिकेतनात घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता नियोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी प्रवेशित असलेल्या संबंधीत संस्थेची असेल.

६. जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत संस्थेत येऊन परीक्षा देतील त्यावेळी संस्था व विद्यार्थ्यांनी कोव्हिड-१९ बाबतच्या केंद्र व राज्यशासनाच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करावे.

७. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता नियमानुसार परीक्षेकरिता अधिकचा वेळ देण्यात येईल व संस्थांमार्फत अशा विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

८. मंडळस्तरावर तसेच संस्था स्तरावर घेण्यात येणाऱ्या हिवाळी परीक्षा २०२० चे स्वरुप ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे, परीक्षा विषयक नियमावलीतील RG11K नुसार Photocopy/Verification and Reassessment ची सुविधा हिवाळी परीक्षा २०२० परीक्षेकरिता देण्यात येणार नाही.

९. परीक्षेबाबतचे ठळक वेळापत्रक खालीलप्रमाणे घोषीत करण्यात येत आहे.

| A. AICTE Approved Engineering Diploma Courses and Pharmacy Courses. | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of practical / Oral Examination | 15 – 24 February 2021 |
| 02. | Conduction of Theory Examination of all Regular & Backlog subject students at MSBTE level. | 02 – 23 March 2021. |

| B. AICTE Approved 1st Semester& Direct 2nd year newly enrolled Engineering Diploma Courses. | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of practical / Oral Examination | 15 – 19 March 2021 |
| 02. | Conduction of Theory Examination at MSBTE level. | 24 – 30 March 2021. |

| C. State Government approved Short term Courses ( Non- AICTE) | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of Practical / Oral Examination for all Regular & Backlog subject students at institute level. | 15 – 24 February 2021 |
| 02. | Conduction of Theory Examinations for Sem/year regular & Backlog Students at institute level. | 02 – 12 March 2021. |

१०. मागील शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रातील जे नियमीत विद्यार्थी मागील परीक्षेदरम्यान Disallowed झाले होते व ज्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये संस्थेत प्रथम सत्रात पुर्नप्रवेश घेतला असुन मंडळाच्या नियमावलीनुसार सत्र कर्म पुर्ण केले आहे अशा विद्यार्थ्यांची परीक्षा मुद्दा क्र. ०९ मधील तक्ता B मध्ये नमुद केलेल्या कालावधीत मंडळस्तरावर घेण्यात येईल.

११. सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG12 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

१२. मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार हिवाळी २०२० परीक्षेबाबतचे सर्व Records संस्थांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवावे.

१३. संस्थेच्या प्राचार्यांनी सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा २०२० करिता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करुन द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत मार्गदर्शन करावे. परीक्षा सुरळीतपणे व विहीत कालावधीत पार पडेल याची दक्षता घेवुन आवश्यक ती कार्यवाही करावी. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व कार्यवाहीकरिता:-
१. प्राचार्य, सर्व स्वायत्त संस्था.
२. उपसचिव, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर , औरंगाबाद.